Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA






Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - III / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शेतकरी आत्महत्या, अनैसर्गिक यथार्थ समस्या<br>**प्रो. डॉ. अवथरे जयेश मो.** | १-६ |
| २ | नक्षलवाद<br>**प्रा. डॉ. स्वाती व्यंकटराव पाटील**<br>**प्रा. रेणुका प्रकाशराव हाक्के** | ७-१० |
| ३ | ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. विद्या मुकुंद ठवकर** | ११- |
| ४ | १८५७ च्या उठावातील बहादुरशहा जफरचे नेतृत्व<br>**Dr. Rajani Wamanrao Wanjari** | १५-१८ |
| ५ | जागतिकीकरण आणि भारतावरील परिणाम<br>**प्रा. राऊलवाड जी. जी.** | १९-२१ |
| ६ | भारतीय अर्थव्यवस्था आणि रोजगार समस्या<br>**प्रा. डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे** | २२-२४ |
| ७ | काळ्या पैश्याची समस्या<br>**डॉ. जे. एम. काकडे** | २५-२८ |
| ८ | भारतीय समाजातील स्त्रियांविरूद्धचे कौटुंबिक हिंसाचार<br>**प्रा. प्रदिप ल. अंबोरे** | २९-३४ |
| ९ | मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून दहशतवादीची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय<br>**श्री. राऊत रामेश्वर बाबासाहेब** | ३५-३८ |
| १० | स्त्री सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान<br>**प्रा. डॉ. सौ. अल्का दहिकर** | ३९-४२ |
| ११ | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ - एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. कदम डी. के.** | ४३-४७ |
| १२ | औद्योगिकरण - भारतीय नागरीकरण व पर्यावरण प्रवाह<br>**प्रा. डॉ. श्रीकांत म. सोनटक्के** | ४८-५१ |
| १३ | राजा ईल व अचलपूर<br>**प्रा. श्याम प्रकाश देवकर** | ५२-५४ |
| १४ | भारताचा कृषी विकास आणि समस्या<br>**प्रो. डॉ. अवथरे जयेश मो.** | ५५-६० |

# ११. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ - एक अध्ययन

**प्रा. डॉ. कदम डी. के.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि. नांदेड.

समाजात अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांचा दर्जा सदैव दुय्यम मानन्यात आला. यामुळे जगातील बहुतांश देशात सर्वच क्षेत्रात पुरुषाचे वर्चस्व निर्माण झालेले दिसून येते. स्त्रीयांचे आयुष्य जन्मापासून दुबळे, कमकुवत, परावलंबी, दुसऱ्याच्या आधाराने चालणारे आहे. संपूर्ण घरातील सारखे श्रमाचे तेच तेच काम करावे लागते. शेती, कारागिरी, इतर कामातही स्त्रीला सर्वसाधारणपणे दुय्यम भूमिका पार पाडावी लागते. पुरुषाने आपले वर्चस्व स्थापीत करण्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्था बदलणे भाग होते. म्हणून स्त्रीला भोगवस्तू करण्याचा प्रयत्न पुरुषांनी केला होता. त्यामुळेच स्त्रीला ‘चुल आणि मुल’ या भूमिकेत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न झाला.

अखिल भारतीय महिला परिषद यासारख्या संघटनांचे कार्य देखील महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्वाचे आहे. भारतात महिला सुधारणेसाठीचा प्रयत्न हा स्वातंत्र्यपूर्वकाळाच्या आगोदर पासून झाला. ब्रिटिश सरकारला महिला विषयक कायदे करण्यास भाग पाडले. म्हणजे ब्रिटिशाच्या काळापासून काही समाजसुधारणेचे कायदे पास झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष समतेची जाहीर नोंद करुन ऐतिहासीक कामगिरी केली आहे.

स्त्रीयांच्या हितसंरक्षणाच्या हेतूने भारतात अनेक कायदे केले (त्यामुळे महिलांना संरक्षण मिळवून आज महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.) त्यात सती प्रतिबंध कायदा - १८२९, हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा - १८५६, भारतीय तलाक कायदा - १८७२, ख्रिस्ती विवाह कायदा - १८७२, लीगल प्रॉपिटशन (वुमेन्स) ॲक्ट - १९२३, बालिका विवाह प्रतिबंध कायदा - १९२६, हिंदू उत्तराधिकार अधिनियम संशोधीत कायदा - १९२६, पारसी विवाह व तलाक कायदा - १९३६, हिंदू नारी संपत्ती अधिकार कायदा - १९३६, हिंदू विजोड विवाह प्रतिबंध कायदा - १९४६, हिंदू विवाह वैधता कायदा - १९५५, हिंदू उत्तराधिकार कायदा - १९५६, हिंदू दत्तग्रहण कायदा - १९५८, वेश्यावृत्ती उन्मुलन कायदा - १९५८, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा - १९५६, मातृत्व लाभ कायदा - १९६१, हुंडाबंदी कायदा - १९६१, स्त्रीयांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा - १९८६, राष्ट्रीय महिला आयोग कायदा - १९९०, कौटुंबिक हिंसेपासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा - २००५ हे स्त्रीयांचे संरक्षणासाठीचे कायदे अतिशय महत्वाचे ठरले. भारत सरकारने महिलांच्या संरक्षणासाठी आणि हक्कांचे रक्षण व्हावे यासाठी अनेक महत्वाचे कायदे संमत केले. त्यातील कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ हा अतिशय महत्वाचा आहे. प्रस्तुत शोध निबंधात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ एक अध्ययन Protection of women from domestic violence - २००५ याचा अभ्यास केला आहे.

**अध्ययनाचा उद्देश (Study of Objective)**

१) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदयाचे सखोल अध्ययन करणे.

२) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदयाचा उद्देश अभ्यासणे.

३) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदयाची व्याप्ती अभ्यासणे.

**तथ्य संकलन (Data Collection)**

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्य संकलन मिळवतांना व्दितीय संकलन पध्दतीचा अवलंब केला आहे. ज्यामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय, शासकीय अहवाल वर्तमानपत्रे, मासिके, शोधप्रबंध, कार्यशाळा, सेमीनार, चर्चासत्र आणि इंटरनेटवरील माहितीचा आधार देण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषण**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या पहिल्या कलमात असा उल्लेख केला की, वंश, लिंग, भाषा व धर्म आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांकरीता मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्य वृध्दींगत करणे व त्यांना समान हक्क प्राप्त करुन देणे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील अनेक कलमात स्त्रियांना हक्काचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे उल्लेख केले आहेत. परिणामी जागतिक पातळीवर महिला संरक्षणासाठी जोमाने प्रयत्न सुरु झाले. त्याचा परिणाम म्हणून सर्वच देशात महिलांच्या हक्काचे व त्यांच्यावर होणारा अत्याचार दूर करण्यासाठी कायदे करण्यास सुरुवात झाली. म्हणुन भारतात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ हा संयुक्त करण्यात आला. कारण पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये नारी जेंव्हा एका बाजूने अति उच्च शिखरे गाठत आहे. त्यांच्या दुसऱ्या बाजूने नारीला कित्येकदा गौण आणि दुय्यम स्थान देण्यात येते. नको त्या पातळीचा हिंसाचार सहन करावा लागतो. नारीला होत असलेला हिंसाचार हा सर्व स्तरातील पुरुषाकडून होतोच पण समाजात महिलांकडून महिलांना हिंसाचार होत असल्याचे सर्वेक्षणातून पुढे आले असल्याचे अॅड.योगेश पवार यांनी मांडले.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ यापूर्वी भारतीय समाजात महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले होते. परंतु कुटूंबातील व्यक्तीकडून स्त्रीयांवर जास्त प्रमाणात अत्याचार होतात. कुटूंबातील हिंसा या विषयावर सर्वेक्षण करण्यात आले या अहवालातून स्पष्ट झाले की, स्त्री ही काळोख्या रात्री सामसुम रस्त्यावर अनोळखी व्यक्तीसोबत एकदा सुरक्षीत राहील परंतु घराच्या चार भिंतीमध्ये आपल्या घरच्या मंडळीमध्ये ती सुरक्षीत असलेच असे नाही. कारण काही घटना अतिशय गंभीर स्वरुपाच्या आहेत की स्वतःच्या आजोबाकडून नातीवर अत्याचार झाला म्हणून रक्तसंबधीय किंवा विवाहबध्द झालेल्या नातेसंबंधातील कोणत्याही व्यक्तीपासून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण मिळावे यासाठी हा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा करावा लागला असल्याचे दिसून येते.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा स्त्रीयांना न्याय मिळवून देण्यासाठी अतिशय महत्वाचा आहे. भारतात दरवर्षी १२ ते १५ हजार विवाहीत स्त्रीया हुंडयाच्या बळी ठरतात. हुंडाबळीचे सर्वाधिक प्रमाण उत्तर भारत, आंध्र प्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, ओरीसा, राजस्थान या राज्यात आढळते. अनेक पालक मुली हुंडा देण्याकरीता कर्जबाजारी होतात तर काहींना आत्महत्या करावी

लागते. परिणाम घर. शेती गहाण ठेवलेल्या असल्यामुळे कुटूंबातील अनेकांना त्रास सहन करावा लागतो. मुलींना वाटते की आपल्यामुळे आई-वडील नातेवाईक सर्वांना त्रास सहन करावा लागतो. याची जाणीव होते तेव्हा मुली घरातून निघून जातात, आत्महत्या करतात. २००८ मध्ये लातूर जिल्हयातील मुलींनी आपल्या बाबाला लग्नासाठी कर्ज काढावे लागते तो कसा लग्न करणार अगोदरच कर्जांचा डोंगर आहे. याचा विचार करुन तीने स्वतःचे जीवन संपवले सर्व आत्महत्या करण्यापुर्वी नोंद करुन ठेवली होती ही अतिशय गंभीर स्वरुपाची घटना होती.

हुंडयामुळे मुलींचा शारिरीक, मानसिक विकास खुंटतो. आई-वडील ज्यांच्याशी ठरवतील त्यांच्याशी लग्न करण्याची मानसिक तयारी होते. यातूनच बिजवर, वृध्द, आजारी अशा कोणात्याही वरास होकार देतात. ही बाब ग्रामीण भागात अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. अशा वरील परिस्थितीवर मात करण्यासाठी असा विचार पुढे आला या विचारातून २००५ कोटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा करण्यात आला.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ हा व्यापक स्वरुपाचा आहे. कारण कुटुंबातील स्त्रीयांना संरक्षण देणारा आहेच. पण या कायदयातील विशेष बाब म्हणजे लिव्ह इन रिलेशनशिप लग्नाशिवाय एकत्र राहणाऱ्या स्त्रीलाही तिच्या पुरुष सहकार्याकडून होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण मिळणारा आहे. घरात स्त्रीचा हिस्सा असो व नसो त्या घरात राहण्याचा तिच्या आणि मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलणे त्या महिलेच्या नवऱ्याला बंधनकारक राहणारा आहे. कुटूंबातील विवाहीत, अविवाहीत बहिणीला भाऊ घराबाहेर काढण्याचे प्रकार घडले आहेत. या कायदयामुळे स्त्रीला एक संरक्षण मिळाले असून कुटूंबात भाऊ हा बहिणीला बाहेर काढू शकत नाही ती विवाहीत असो, अविवाहीत असो. त्यामुळे हा कायदा महिलांच्या सबलीकरणासाठी एक महत्वाचा मानला जातो.

तसेच दावा दाखल झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत ती केस निकाली काढण्याचे बंधन मॅजिस्ट्रेटवर टाकण्यात आले आहे. गुन्हयानुसार आरोपींना एक वर्ष सश्रम कारावास २० हजार रुपये दंड ठोठावला जाणार आहे. हा गुन्हा अजामीनपात्र राहील.

कौटुंबिक हिंसाचार कायदया अंतर्गत ३७ कलमांचा समावेश आहे. हा कायदा सर्वसामान्यांना सहज समजते अशा स्वरुपाचा आहे. या कायदयातील

कलम (१) नांव या कायदयाची व्याप्ती आणि प्रारंभ.

कलम (२) कौटुंबिक हिंसाचार कायदयाची व्याख्या.

कलम (३) कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या.

कलम (४) संरक्षण अधिकाऱ्याला माहिती देणे.

कलम (५) पोलीस अधिकारी न्यायदंडाधिकारी आणि सेवा देणारे यांची कर्तव्ये.

कलम (६) आधार श्रमाच्या मुख्याधिकाऱ्याची कर्तव्य.

कलम (७) वैद्यकिय सुविधेची कर्तव्य.

कलम (८) संरक्षण अधिकाऱ्याची नेमणूक.

कलम (९) संरक्षण अधिकाऱ्याची कार्य / कर्तव्य.

कलम (१०) सेवा देणारे महिलांना साहाय्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्था मान्यता देणे.

कलम (११) सरकारची कर्तव्ये समावेश.

कलम (१२) साहाय्य मिळण्यासाठी दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे.

कलम (१३) नोटीस बजावणे.

कलम (१४) समुपदेशन करणे.

कलम (१५) कल्याण तज्ञांचे साहाय्य घेणे.

कलम (१६) कक्षांतर्गत सुनावणी करणे यात कोणत्याही पक्षाकडून अशी मागणी झाल्यास व दंडाधिकाऱ्या मते तशी परिस्थिती असल्यास इन कॅमेऱ्यात सुनावणी घ्यावी लागते.

कलम (१७) एकाच घरात भागीदारीत राहण्याचा हक्क मागणे.

कलम (१८) संरक्षणाचा आदेश यात कौटुंबिक हिंसाचार घडला असेल तर न्यायदंडाधिकारी पीडीत व्यक्ती बाजूने संरक्षण आदेश काढू शकतात.

कलम (१९) निवासी आदेश.

कलम (२०) आर्थिक साहाय्याचा आदेश.

कलम (२१) मुलांचा ताबा आदेश.

कलम (२२) नुकसान भरपाईचा आदेश.

कलम (२३) अंतरिम किंवा एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार.

कलम (२४) न्यायालयाने मोफत आदेशाच्या प्रती देणे.

कलम (२५) आदेशाची कालावधी व आदेशातील बदल.

कलम (२६) दुसऱ्या खटल्यापासूनचे फायदे व इतर कायदेशीर कारवाईतून मुक्ती.

कलम (२७) अधिकार क्षेत्र.

कलम (२८) कार्यपध्दती

१) कलम - १२, १८ ते २३ व कलम ३१ खालील गुन्हयांची सुनावणी फौजदारी कार्यपध्दती संहिता १९७३ नुसार के जाईल.

२) कलम १२ व २३ साठी न्यायालय स्वतःची पध्दत वापरु शकेल.

कलम (२९) अपील करण्याचा अधिकार.

कलम (३०) संरक्षण अधिकारी व सेवा देणारे सदस्य हे IPC कलम २१ नुसार लोकसेवक म्हणून समजण्या येतील.

| | |
|---|---|
| कलम (३१) | प्रतिवादीकडून संरक्षण आदेशाचे उल्लंघन झाल्यास शिक्षा |
| कलम (३२) | दखल आणि पुरावा. |
| कलम (३३) | संरक्षण अधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर केल्यास पात्र असलेली शिक्षा व दंड. |
| कलम (३४) | संरक्षण अधिकाऱ्याविरुध्द गुन्हयाची दखल घेण्यासाठी राज्य सरकारच्या पूर्वपरवानगीने तक्रार करावी लागते. |
| कलम (३५) | संरक्षण अधिकाऱ्याच्या सद्भावनापूर्वक कृतीला संरक्षण. |
| कलम (३६) | हा कायदा इतर कायदयांना पुरक असेल पण इतर कायदयाची पायमल्ली करणार नाही. |
| कलम (३७) | केंद्राला नियम करण्याचा अधिकार |

**सारांश**

महिला संरक्षण देणारा हा कायदा अतिशय महत्वाचा आहे. भारतीय दंड संहितेने अशा घटनामधील दोषींना शिक्षेची तरतुद केली. त्यामध्ये प्रामुख्याने कौटुंबिक कलह, हिंसाचार, क्रुरतापासून संरक्षणासाठी कलम ४९८ नुसार तरतुद आहे. हिंसाचारापासून महिलांचे पूर्णपणे सरंक्षण व्हावे हा कायदयाचा उदात्त हेतू आहे. कौटुंबिक हिंसाचार कायदा महिलांचे संरक्षणाचे महिलांचे हत्यार ठरला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

३) डॉ.स्मीता मेहत्रे - भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) प्रा.अमिर शेख - महिला व बालविकास कायदे, मिराबी प्रकाशन, पुणे.

५) प्रा.व्ही.बी.पाटील - मानवी हक्क, के.सागर पब्लीकेशन्स, पुणे.

६) मेधा ताडपत्रीकर - कौटुंबिक हिंसाचार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे.